2 1 APR 2017
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात दिव्यांगांसाठी समावेशी शिक्षण संसाधन केंद्राचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयात राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानांतर्गत (रूसा) दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी नव्याने स्थापित करण्यात आलेल्या समावेशी शिक्षण संसाधन केंद्राचे उद्घाटन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांच्या हस्ते पार पडले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, खा. धनंजय महाडिक यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

'रूसा'कडून प्राप्त झालेल्या निधीमधून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रिसोर्स सेंटर फॉर इन्क्लुसिव्ह एज्युकेशन (आर.सी.आय.ई.) अर्थात समावेशी शिक्षण संसाधन केंद्र ग्रंथालयात उभारण्यात आले आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांना अव्यंग विद्यार्थ्यांच्या बरोबरीने शिक्षणाच्या संधी उपलब्ध कराव्यात, त्यांना आवश्यक साधन-सुविधा तसेच अभ्यासपूरक पर्यावरण उपलब्ध करून द्याव्यात, हा हेतू या केंद्राच्या उभारणीमागे आहे. या ठिकाणी अंध, मूकबधीर, अस्थिव्यंगबाधित, गतिमंद अशा सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांना आवश्यक अध्ययन साधनांची उपलब्धता करण्यात आली आहे, अशी माहिती केंद्र समन्वयक डॉ. नमिता खोत यांनी यावेळी दिली.

या केंद्रात ब्रेल पुस्तके, ऑडिओ बुक्स, स्क्रीन रीडिंग सॉफ्टवेअर बसविलेले संगणक, ब्रेल प्रिंटिंग, ई-बुक्स, ई-जर्नल्स, ई-डाटाबेसेस सारखे ई-रिसोर्सेस, वाय-फाय सुविधेसह इंटरनेट, मॅग्निफायर, स्पेक्टॅकल्स यासारखी अल्पदृष्टी विद्यार्थ्यांना उपयुक्त साधने व सुविधांची उपलब्धता करून देण्यात आली आहे. यावेळी महाराष्ट्र शासनाच्या प्रधान सचिव व राज्य प्रकल्प संचालक (रूसा) श्रीमती मीता राजीवलोचन, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ महाराज विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जी. एन. शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यापीठाच्या रूसा केंद्राच्या समन्वयक डॉ. अकल्पिता अरविंदेकर, नांदेड विद्यापीठाचे प्रधान इन्व्हेस्टिगेटर डॉ. शैलेश वढार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रधान इन्व्हेस्टिगेटर डॉ. प्रवीण यन्नावार, रूसाचे सहसंचालक शरद पाटील यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# ज्येष्ठांनी आनंदाने जगावे : डॉ. शिंदे


**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात ज्येष्ठ नागरिकांच्या मेळाव्याचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. यावेळी डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. सुमन बुवा आदी.**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जीवनातील अडीअडचणींची चिंता न करता, भविष्यातील समस्येचा विचार न करता जीवनातील येणारा प्रत्येक क्षण ज्येष्ठांनी आनंदाने जगावा, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि राष्ट्रीय सेवायोजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ज्येष्ठ नागरिकांच्या स्नेह मेळाव्यात ते बोलत होते. वि.स. खांडेकर भाषा भवन येथे पार पडलेल्या स्नेहमेळाव्याला सुमारे चारशे ज्येष्ठ नागरिकांची उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, आपण आपले सर्व आयुष्य जगण्याच्या स्पर्धेत घालवितो. नोकरीमध्ये कष्ट करतो. त्यामुळे आयुष्यात अनेक छंदांना वेळ देऊ शकत नाही आणि अनेकदा आवडत्या गोष्टी करावयाच्या राहून जातात.

शिवाजी विद्यापीठाचा आजीवन अध्ययन व विस्तार विभाग हा आपल्यासाठी सदैव वेगवेगळ्या योजना घेऊन येत राहील. त्यांचाही आपण लाभ घ्यावा, असे आवाहनही यावेळी कुलगुरूंनी केले. या स्नेहमेळाव्यात गीते, भावगीते, शास्त्रीय गायन, नाट्यछटा इत्यादी विविध गुणदर्शनाच्या स्पर्धा झाल्या. त्याला सहभागी ज्येष्ठांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमासाठी कुलगुरूंच्या मातोश्री श्रीमती नागरबाई शिंदे, डॉ. शकुंतला सोळंके, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. सुमन बुवा, डॉ. य. ना. कदम, डॉ. मानसिंगराव जगताप, डॉ. शिवाजीराव हिलगे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

2 1 APR 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील दोघींना जर्मनीसह फ्रान्सची शिष्यवृत्ती

## मानसी हुपरीकर नॅनो सायन्समध्ये तर नीलम यादव बीएस्सीत करणार संशोधन

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजीमधील मानसी हुपरीकर हिला जर्मनीमध्ये संशोधनाची, तर बीएस्सीमध्ये शिकणाऱ्या नीलम यादव हिला ३० लाखांच्या शिष्यवृत्तीसह फ्रान्समध्ये उच्चशिक्षणाची संधी मिळाली आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनाही आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञानाचे लाभ मिळवून देण्याच्या दृष्टीने विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त २०१२ मध्ये स्कूल ऑफ नॅनो सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजीची स्थापना केली. समन्वयक म्हणून पदार्थविज्ञान शास्त्राच्या प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांच्याकडे जबाबदारी सोपविली. बारावीनंतर विद्यार्थ्यांना बी.एस्सी.,एम.एस्सी. एकात्मिक अभ्यासक्रम येथे उपलब्ध करून दिला.

शाखेच्या पहिल्या बॅचची विद्यार्थिनी मानसी सध्या एम.एस्सी. भाग २ मध्ये शिकते आहे. तिला जर्मनीमधील मारबर्ग येथील जगप्रसिद्ध फिलिप्स विद्यापीठात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संशोधक प्रा. डॉ. वोल्फगँग पारक यांच्याकडे इंटर्नशिप करण्याची संधी मिळाली आहे. बी.एस्सी. भाग ३ मध्ये शिकत असलेल्या नीलमला फ्रान्समधील पॅरिस-सुड विद्यापीठात पुढील पदव्युत्तर शिक्षण प्राप्त करण्याची संधी मिळाली आहे. त्यासाठी पुढील दोन वर्षांसाठी तिला इरॅस्मस मुंडस ही सुमारे ३० लाख ६६ हजार रुपये इतक्या रकमेची शिष्यवृत्ती मिळाली आहे. या विद्यार्थिनींना स्कूल ऑफ नॅनो सायन्स अॅंड टेक्नॉलॉजी अधिविभागाचे समन्वयक व विद्यापीठाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह डॉ. के. के. शर्मा, डॉ. शिवदत्त प्रभू यांचे मार्गदर्शन मिळाले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दोन्ही विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. या प्रसंगी डॉ. पाटील, डॉ. पी. डी. राऊत उपस्थित होते.

### दोघी सर्वसामान्य कुटुंबातील

मानसी व नीलम सर्वसामान्य कुटुंबातील आहेत. नीलम मूळची उत्तर प्रदेशातील असून तिचे वडील घनश्याम यादव पेंटर कॉन्ट्रॅक्टर आहेत. व्यवसायानिमित्त हे कुटुंब कोल्हापुरात स्थायिक झाले. मानसीचे वडील प्रमोद हुपरीकर इचलकरंजीच्या शाहू हायस्कूलचे मुख्याध्यापक आहेत, तर आई गृहिणी आहे. मानसीला आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या संशोधकांसमवेत संशोधन करण्याची संधी मिळते आहे, ही अत्यंत अभिमानाची बाब असल्याचे डॉ. पी. एस. पाटील यांनी सांगितले.



कोल्हापूर : नीलम यादव व मानसी हुपरीकर यांचे पुष्पगुच्छ देऊन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी अभिनंदन केले. शेजारी डॉ. पी. एस. पाटील

जनसंपर्क कक्ष
21 APR 2017 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : प्रा. के. एम. मोरे यांच्याकडून एक लाख रुपयांचा धनादेश स्वीकारताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी उपकुलसचिव डॉ. एस. एम. शिंदे, डॉ. एम. एल. जाधव.

# प्रा. मोरे यांच्यातर्फे विद्यापीठाला एक लाख

कोल्हापूर, ता. २० : शहाजी कॉलेजचे निवृत्त शिक्षक प्रा. के. एम. मोरे व त्यांच्या पत्नी कुंदा मोरे यांनी आपल्या आई-वडिलांच्या स्मरणार्थ एक लाख रुपयांचा निधी शिवाजी विद्यापीठाकडे नुकताच सुपूर्द केला. या निधीच्या व्याजातून एम. ए. राज्यशास्त्र विषयामध्ये सर्व प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांस पारितोषक दिले जाणार आहे. प्रा. मोरे मूळचे उरण-इस्लामपूर येथील आहेत. त्यांचे वडील महादेव मोरे वारकरी होते. १०४ वर्षी त्यांचे निधन झाले. ते नियमित ज्ञानेश्वरी पारायण करीत. त्यांनी गावातील मुलांना शिक्षणाविषयी जागृती घडविली. याचे स्मरण ठेवत प्रा. मोरे दांपत्यांनी त्यांच्या स्मणार्थ शिवाजी विद्यापीठाला हा निधी दिला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 APR 2017
महाराष्ट्र टाईम्स

# बेटी बचाओ व्याख्यान

**कोल्हापूर :** 'समाजातील स्त्री भ्रूण हत्येचे प्रमाण चिंताजनक आहे. मुळात लैंगिक गुन्ह्यांना स्त्री-पुरुष जन्मदर नियंत्रणातूनच आळा बसेल', असे मत जिल्हा न्यायाधीश एस. पी. कुलकर्णी यांनी व्यक्त केले. महावीर महाविद्यालय, जिल्हा विधी प्राधिकरण व श्री महालक्ष्मी अन्नछत्र सेवा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बेटी बचाओ बेटी पढाओ कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमनार होते. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ एल. एस.पाटील, न्यायाधीश उमेशचंद्र मोरे, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर व राजू मेवेकरी आदी उपस्थित होते.